पालघर जिल्हयातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्याकरिता स्पीड बोट व टोईंग बोट भाडेतत्त्वावर घेण्याकरिता प्रशासकीय मंजूरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०६१८/प्र.क्र.२३७/ख
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९.

<u>संदर्भ:-</u> (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, समक्रमांक दि. २७ जून, २०१८

(२) जिल्हाधिकारी, पालघर यांची पत्रे

अ) क्र. रेतीगट/गौख/टे-२/कावि-२०८/१९ दि. १४.०६.२०१९

ब) क्र. रेतीगट/गौख/टे-२/कावि-२५०/१९ दि. ०७/०८/२०१९

प्रस्तावना:-

मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडे दाखल जनहीत याचिका क्रमांक ७९/२०१४ ज्युली खारभूमी लाभार्थी शेतकरी संस्था मर्या. नारिंगी विरुद्ध जिल्हाधिकारी पालघर या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३,४,६,१० व १२ एप्रिल,२०१८ रोजी वैतरणा रेल्वे पूल (९२,९३,८८,९१,९०) व वैतरणा खाडी क्षेत्र परिसरात होत असलेल्या अवैध वाळू / रेती उत्खनन, वाहतूक रोखण्याच्या सूचना जिल्हाधिकारी पालघर यांना दिल्या आहेत. तसेच अवैध वाळू / रेती उत्खनन करणा-या बोटी / सक्शन पंपावर कार्यवाही करण्याकरिता नव्याने बोटी व इतर साधनसामुग्री खरेदी करण्याकरिता जिल्हाधिकारी, पालघर यांनी शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी पालघर यांनी नव्याने बोटी खरेदी व अन्य साधनसामुग्री खरेदी करण्याकरिता रु. ३४ कोटी एवढी वित्तीय तरतूद मिळण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने संदर्भांकीत क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये पालघर जिल्हयातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरिता बोट व इतर साधनसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी पालघर यांनी बोट खरेदी करिता निविदा प्रक्रीया राबवली तथापि, सदर निविदा प्रक्रीयेस अपेक्षीत प्रतिसाद मिळाला नाही. आता, जिल्हाधिकारी पालघर यांनी संदर्भांकीत क्रमांक २ येथील पत्रान्वये पालघर जिल्ह्यात अवैध वाळू/रेती उत्खनन करणा-या बोटीविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता बोटी खरेदी न करता भाडेतत्वावर घेणे बाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने बोटी खरेदी न करता भाडेतत्वावर घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

यास्तव, शासन निर्णय महसूल व वन विभाग समक्रमांक दिनांक २७/०६/२०१८ निरसीत करण्यात येवून सुधारीत शासन निर्णय खालीलप्रमाणे:-

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या "जनहित याचिका क्रमांक ७९/२०१४ - ज्युली खारभूमी लाभार्थी शेतकरी संस्था मर्या. नारंगी विरुध्द जिल्हाधिकारी, पालघर" या प्रकरणी दिनांक ३,४,६,१० व १२ एप्रिल,२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पालघर जिल्हाकरिता अवैध वाळू/रेती उत्खनन करणाऱ्या बोटीविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता स्पीड बोट व टोईंग बोट

भाडेतत्वावर घेण्यास व त्यापोटी वर्ष २०१९-२० मध्ये येणारा आवर्ती खर्च रु. ०५ कोटी (अक्षरी रु. पाच कोटी फक्त) एवढया खर्चास सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. यापोटी होणारा खर्च "सन २०१९-२० या वर्षाकरिता, मागणी क्र. सी-१, २०५३-जिल्हा प्रशासन, (००) (०९३) जिल्हा आस्थापना, (०१) सर्वसाधारण आस्थापना, (०१) (०१) आयुक्त कोकण (अनिवार्य), "२०५३००२८" १३-कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणाऱ्या अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. पालघर जिल्हयातील अवैध वाळू/रेती उत्खनन करणाऱ्या बोटींविरुध्द निरंतर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता स्पीड बोट व टोईंग बोट भाडेतत्वावर घ्यावयाच्या असल्याने यावरील आवर्ती खर्च भागविण्यासाठी प्रत्येक वर्षीच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये सदर मागणीचा समावेश जिल्हाधिकारी पालघर यांनी विभागीय आयुक्त कोकण यांचेमार्फत करून घ्यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.३३७/२०१९/व्यय-९, दि.२१/०८/२०१९ अन्वये दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१९२०२०१३६४१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.09.19 20:25:36 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जिल्हाधिकारी, पालघर.
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
५) सह सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-९), मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवड नस्ती, कार्यासन ख, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.